## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२३ (प्रतिनिधी)- उच्च व तंत्रशिक्षणा विभाग मंत्रालय महाराष्ट्र राज्य , रा. से. यो कक्ष मुंबई यांच्या वतीने नेरळ येथे झालेल्या प्रेरणा राज्य स्तरीय नेतृत्वगुण विकास शिबिरात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला विविध गटातील सहा पारितोषिके प्राप्त झाली.

दि.१७ ते २२ फेब्रुवारी या कालावधीत मुंबई विद्यापीठ मुंबई अधिनस्त एस.एस.टी. महाविद्यालय, उल्हासनगर यांचे आयोजन दिलकॅप महाविद्यालय नेरळ ता.कर्जत,जि.रायगड येथे करण्यात आले. या शिबीरात कवयित्री बहिणाबाई चौधरी,उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगावच्या* संघात तीन पुरुष व तीन महिला स्वयंसेवक तसेच एक संघ व्यवस्थापक प्रा. राजेश्वरसिंग सरदारसिंग पाडवी सहभागी झाले. या शिबिरात गोपाल देविदास पाटील या स्वयंसेवकाला उत्कृष्ट नेता हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच इतर सहभागी स्वयंसेवकांमध्ये निकिता मालेवार अष्टसंघटन या ग्रुपमध्ये पोस्टर स्पर्धेत द्वितीय व स्लोगन स्पर्धेत तृतीय, दिव्या पाटील हिला *पोस्टर स्पर्धेत प्रथम, स्लोगन स्पर्धेत प्रथम तसेच *पोस्टर स्पर्धेत तृतीय* पारितोषिक मिळाले. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र- कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, रासेयो संचालक डाॅ. सचिन नांद्रे यांनी संघाचे अभिनंदन केले.

..........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २३ फेब्रुवारी, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता